**MHKO100007182019**

## आदेश निशाणी क्र. १४

वि.प.क्र.२ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "म्हणणे नाहीचा" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** वि.प.क्र.२ यांचा अर्ज व अर्जदार यांनी दाखल केलेले निशाणी क्र. १५ वरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**३.** वि.प.क्र.२ यांचे असे कथन आहे की, वि.प.क्र.२ यांनी म्हणणे देणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वि.प.क्र.२ यांना आपले म्हणणे देणेस जवळजवळ १४ महिन्यांचा विलंब झालेला आहे यामध्ये साधारण १ वर्षाचा कालावधी हा कोविड १९ या संसर्गजन्य आजारामुळे व कोर्ट कामकाज या कालावधीत बंद असल्यामुळे तसेच बससेवा बंद असल्यामुळे येणे जाणे अडचणीचे झाले. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्जदार यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल अर्जातील मजकुर नाकारला आहे. वि.प.क्र.२ यांनी विलंबाबतचे योग्य कारण दिलेले नाही व दिलेले कारण चुकीचे आहे. सबब अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** अर्जदार यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २अ प्रमाणे दाखल केला आहे. वि.प.क्र.२ यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. वि.प.क्र.२ यांना म्हणणे मांडण्याची संधी देणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने गरजेचे आहे तसे न झाल्यास निश्चितपणे नैसर्गिक न्याय तत्वाचे उल्लंघन होईल. अर्जाचा गुणदोषावर निकाल करणेसाठी वि.प.क्र.२ यांचे म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत वि.प.क्र.२ यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वि.प.क्र.२ यांनी आपले म्हणणे दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वि.प.क्र.२ यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# <u>आ दे श</u>

१)    वि.प.क्र.२ यांचा निशाणी क्र. १४ वरील अर्ज अर्जदार यांना खर्चादाखल रक्कम **रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र)** देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२)    वि.प.क्र.२ यांनी खर्चाची रक्कम अर्जदार यांना दिल्यानंतर वि.प.क्र.२ यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.03.23 14:47:58 +0530

**ठिकाण – गडहिंग्लज**
**दिनांक २३/०३/२०२३**

**(म. ता. खराडे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.**
**गडहिंग्लज**